FORM-1 A N.C.R.B. I.I.F.-1

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम 154 अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला. प्र. वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No.: ८२, वर्ष Year: 2022, दिनांक Date: २८/११/2022

2. (i) अधिनियम Act: भ्र. प्र. अधि. १९८८, कलमे Sections: १३ (१) (ड) सह १३ (२)
   (ii) अधिनियम Act ............, कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day ............, तारीख पासून Date from ०१/०३/२००८, वेळ Time ते, तारीख पर्यंत Date to ३१/०३/२०१८, वेळ Time ............
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेचा Information received at P.S. तारीख Date: २८/११/2022, वेळ Time ............
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: २८/२०२२, तारीख Date: २८/११/2022, वेळ Time: १५:०५

4. माहितीचा प्रकार Type of Information : ............, लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण Place of Occurrence : (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Direction and distance from P.S. ............, चौकी / बीट / दुरक्षेत्र नाव व क्र. Chouki/Beat/O.P. Name and No. ............
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: तहसिलदार व नगर भूमापन कार्या., ठिकाणाचे नंबर No. if any: चौथा मजला, गल्ली Ward: नाटकवाला लेन, रस्त्याचे नाव Name of road: बोरीवली (प) मुंबई.
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable Place ............, गाव Village ............, पोस्ट Post ............, तालुका Taluka ............, जिल्हा Distt. ............, राज्य State ............
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............, तालुका Taluka ............, जिल्हा Distt. ............, राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: सुनिल लांघी (b) वडीलाचे / पतीचे नाव Father's /Husband's Name: ज्ञानेश्वर लोंढी
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth & Age: ४१ वर्ष (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतिय, फोन नं. Phone No.: ९०५०४४४४४४.
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ दिल्याचा दिनांक Date of Issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation: नोकरी
   (g) धर्म Religion: हिंदू, जात Caste ............, जनजात Sub-Caste ............
   (h) पत्ता Address : बी. ६०४ ...... गल्ली / सर्वे नं. Ward ...... घर / नाव नंबर House/Name No. ...... फोन / मो. नंबर Phone/M. No. ...... पॅन नं. Pan No. ...... वोटर्स नं. Card No. ...... मास्या अॅव्हेन्यु चौगुले नगर, बोरीवली पुर्व मुंबई - ६६.
   रस्त्याचे नाव Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ पो. स्टे. P. Stn. ............
   तालुका Taluka ............ जिल्हा Distt. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयीताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासीक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

   प्रदिप रामचंद्र सावरे, तत्कालीन नगर भूमापन अधिकारी, बोरीवली कार्यालय तहसिलदार व नगर भूमापन कार्यालय इमारत, चौथा मजला नाटकवाला लेन, बोरीवली पश्चिम, मुंबई.

क

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी सुनील ज्ञानेश्वर लांडगे, पोलीस निरीक्षक, ला. प्र. वि. मुंबई यांचा दि. २८/११/2022 रोजीचा फिर्यादी जबाब स्वतंत्र पानावर नोंदविण्यात / टंकलिखीत करण्यात आलेला आहे. त्यास सदर गुन्हाच्या प्रथम खबरी अहवाल संबोधण्यात येत आहे.

समक्ष

अजित झांजुर्णे
पोलीस निरीक्षक

सुनील लांडगे
पोलीस निरीक्षक
ला. प्र. वि. मुंबई.

फिर्याद दि. २८/११/२०२२

सुनील ज्ञानेश्वर लांघी, वय — ४१ वर्षे, धंदा—नोकरी, पोलीस निरीक्षक, (एक टप्पा पदोन्नतीने), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई—४०० ०३०) यांची फिर्याद.

१. मी सुनील ज्ञानेश्वर लांघी, माहे सप्टेंबर २०१९ पासुन एक टप्पा पदोन्नतीने पोलीस निरीक्षक या पदावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे नेमणुकीस आहे.

२. **प्रकरणाची थोडक्यात हकिगत** :— फिर्यादी श्री. प्रशांत अंकुश राणे यांच्याकडे सिंडीकेट बँक स्टाफ, अभिमान को.ऑ.हौ. सोसायटी लि. या सोसायटीच्या नावे स्वतंत्र मिळकत पत्रिका करून देण्याकरीता भ्रष्टरित्या स्वत:चे फायदयाकरिता कायदेशिर परिश्रमीकाखेरीज गैरमार्गाने रुपये २,००,०००/— लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रार केली होती. सदर तक्रारीची दोन पंचासमक्ष दि. ०९/०३/२०१८ रोजी पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान गै.अ. प्रदिप रामचंद्र तावरे, तत्कालिन नगर भूमापन अधिकारी, बोरीवली कार्यालय,तहसीलदार व नगर भूमापन कार्यालय इमारत, चौथा मजला, नाटकवाला लेन, बोरीवली (प) मुंबई यांनी फिर्यादी श्री. प्रशांत राणे यांच्याकडे कायदेशिर परिश्रमीकाखेरीज गैरमार्गाने रुपये २,००,०००/— लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले. दि. १४/०३/१८ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक प्रदिप तावरे यांना लाचेची रक्कम रू. २,००,०००/— स्विकारताना रंगेहाथ पकडण्यात आल्याने पो.नि संजय शिंदे यांनी गुन्हा दाखल केला आहे. पो. नि शिंदे यांची बदली झाल्याने सदरचे प्रकरण सपोआ मुगूटराव यांना पुढील चौकशीकरीता वर्ग करण्यात आले होते.

२.१ सपोआ महेश मुगुटराव यांना उपरोक्त संदर्भान्वये गैरअर्जदार प्रदिप तावरे, तत्कालिन नगर भूमापन अधिकारी यांच्याविरूध्द लाप्रवि परिपत्रक क्र. ९०४०/महासंचालक/लाप्रवि/म.रा./२००९, दिनांक ११/१२/२००९ अन्वये उघड चौकशी सुरू करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत.

२.२ त्यानंतर सदरची उघड चौकशी क्र. ५०/१९ ही जा.क्र. १२६१२/लाप्रवि/बृमुंवि/अपोआ/१९, दिनांक २१/१२/२०१९ रोजी पुढील कार्यवाही करीता सपोआ श्री. सुधीर कुडाळकर यांना वर्ग करण्यात आली होती. सदर उघड चौकशीचा अंतिम अहवाल सपोआ श्री. कुडाळकर यांनी दिनांक १९/१०/२०२० रोजी सादर केला असुन त्यामधील त्रुटींसंदर्भात त्यांना दिनांक ०३/११/२०२० रोजी ज्ञापन देण्यात आले होते. सदर ज्ञापनाचे अनुषंगाने त्रुटी पुर्तता करून सपोआ श्री. कुडाळकर यांनी दिनांक १४/१२/२०२० रोजी त्रुटी पुर्तता अहवाल सादर केला आहे.

२.३ सदरची चौकशी जा.क्र. २८०५/लाप्रवि/बृमुवि/उचौ ५०/१९/वा ०२/२०२१ दि. १७/०२/२०२१ अन्वये आम्हास वर्ग करण्यात येत असल्याबाबत ज्ञापन प्राप्त होवुन त्यानुसार सदर चौकशीची कागदपत्रे दिनांक २२/०२/२०२१ रोजी प्राप्त झाली आहेत. गै.अ. श्री. प्रदिप तावरे यांचे उत्पन्न, खर्च व मालमत्तेचा कालावधी दिनांक ०१/०३/२००८ ते १४/०३/२०१८ पर्यंत धरण्यात आलेला आहे. सदर प्रकरणाची सखोल चौकशी करुन उघड चौकशी क्र. ५०/२०१९ मध्ये खालील बाबी निष्पन्न झाल्या.

३. **लोकसेवक श्री. प्रदिप तावरे यांची कौटूंबिक पार्श्वभूमी :—**

१) **वडील—** श्री.रामचंद्र नामदेव तावरे वय ६२ वर्षे, व्यवयास :— पत्रकार व शेती, राठी :— ९९६, बारामती फलटण रोड, आंदोबावाडी, ग्रामपंचायत —पावणेवाडी, पो. शिवनगर, ता बारामती जि. पुणे पिन ४१३११२ (मो.क्र. ७८८७७९२५३५)

Scanned with OKEN Scanner

**२) आई** — सौ. रंजना रामचंद्र तावरे वय ५५ वर्षे, व्यवसाय :— गृहिणी, राठी :— वरील प्रमाणे

**३) भाऊ**— श्री. शारद रामचंद्र तावरे वय ३६ वर्षे, व्यवसाय :— खाजगी नोकरी, राठी :— कोंडवा, पुणे.

**४) पत्नी** — सौ. दिपमाला प्रदिप तावरे, वय ३८ वर्षे, व्यवसाय :— गृहिणी, सन २००८ मध्ये लग्न झाले.

**५) सासरे**— कै. अंबादास लक्ष्मण भोसले, हे २०१७ रोजी मयत झालेले असून ते व्यवसाय शेती करीत होते व बारामती येथे रहावयास होते.

**६) सासु** — कै. लता अंबादास भोसले हया सन २०१५ साली मयत झालेल्या असून त्या गृहिणी होत्या.

**७) मेव्हणा**— श्री. परशुराम अंबादास भोसले, वय ३५ वर्षे, व्यवसाय:— सिध्दीविनायक कंम्युटर, रा.ठी. बारामती,

**८) मुलगा** — कु. योगराज प्रदिप तावरे याचा जन्म २८/१०/२०११ मध्ये झाला आहे. तसेच सद्या तो विस्डम वर्ल्ड, हडपसर, पुणे येथे इयत्ता दुसरीमध्ये शिकत आहे.

गै.अ. तावरे यांचा जन्म सन १९७९ रोजी मु.पो. आंदोबावाडी, फलटन रोड, ता. बारामती, जिल्हा— पुणे येथे झाला आहे. गै.अ. यांचे प्राथमिक शिक्षण जीवन शिक्षा विद्या मंदिर, पाहुणेवाडी, तालुका— बारामती, जिल्हा—पुणे येथे झाले आहे. त्यानंतर त्यांनी माध्यमिक शिक्षण हे आर.एन.अग्रवाल टेक्निकल हायस्कुल,बारामती येथून पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी ११ वी व १२ वी भालोजीराजे कृषी विद्यालय, फलटण, जिल्हा—सातारा येथून केले. त्यानंतर ॲग्रीकल्चर कॉलेज, पुणे येथून ग्रॅज्युएशन पूर्ण करून, नागपूर ॲग्रीकल्चर कॉलेज येथून पोस्ट ग्रॅज्युएशन पूर्ण केले आहे. गै.अ. यांचे वडील रामचंद्र नामदेवराव तावरे हे पत्रकार म्हणून नोकरीस होते. त्यांनी रविकिरण हे साप्ताहीक चालवितात. गै.अ. यांचे वडील, आई श्रीमती रंजना व भाऊ श्री. शरद असे रूम नं.७, श्रीराम अपार्टमेन्ट, तांदुळवाडी, बारामती येथे राहतात. गै.अ. यांचे वडील, भाऊ व आई हे शेती करून त्यांचा उदरनिर्वाह चालवितात.

**४. लोकसेवक श्री. प्रदिप तावरे यांचा सेवा इतिहास :—**

गै.अ. प्रदिप तावरे यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंर गै.अ. यांनी एमपीएससी मार्फत भूमि अभिलेख खात्यात परिक्षा देवून तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, दक्षिण सोलापूर येथे सन २००८ मध्ये नोकरीस लागले. गैरअर्जदार प्रदिप तावरे यांची नियुक्ती तालुका निरीक्षक म्हणुन भूमि अभिलेख, दक्षिण सोलापूर येथे झाल्यांनतर खालील नमुद ठिकाणी त्यांच्या नेमणुका झालेल्या आहेत.

| अ.क्र. | वर्ष/कालावधी | नेमणुकीचे ठिकाण | पदभार |
|---|---|---|---|
| ०१ | ०१/०३/२००८ ते ३१/०८/२०१० | उप अधिक्षक भूमि अभिलेख, सोलापूर | तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख, दक्षिण सोलापूर |
| ०२ | ०१/०९/२०१०ते २८/०२/२०१२ | उप अधिक्षक भूमि अभिलेख, दौंड | उप अधिक्षक भूमि अभिलेख, दौंड |
| ०३ | २८/०२/२०१२ ते ३१/०५/२०१५ | उप अधिक्षक भूमि अभिलेख, कर्जत, रायगड | उप अधिक्षक भूमि अभिलेख, कर्जत, रायगड |
| ०४ | ०१/०६/२०१५ ते २८/०२/२०१८ | नगर भूमापन अधिकारी, बोरीवली, मुंबई | नगर भूमापन अधिकारी |

Scanned with OKEN Scanner

५. उघड चौकशी क्र. ५०/२०१९ च्या अनुषंगाने गै.अ. यांचे कार्यालय, बँका, शासकीय व खाजगी कार्यालये यांचेशी पत्रव्यवहार करुन आवश्यक ती माहिती व कागदोपत्री पुरावे प्राप्त करण्यात आले. त्यानुसार लोकसेवक श्री. प्रदिप तावरे यांचा परिक्षण कालावधी (Check Period) हा दिनांक ०१/०३/२००८ ते १४/०३/२०१८ पर्यंत असा ग्राहय धरण्यात आला आहे.

५.१ उपरोक्त परिच्छेद क्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या कालावधीत लोकसेवक श्री. प्रदिप तावरे यांच्या स्थावर व जंगम मालमत्ता, उत्पन्न व खर्च यांचा तपशील पुढील प्रमाणे असल्याचे निष्पन्न झाले आहे.

**गै.अ. लोकसेवक प्रदिप तावरे यांचे परिक्षण कालावधीतील मालमत्ता, उत्पन्न व खर्च.**
**(परिक्षण कालावधी दिनांक ०१/०३/२००८ ते १४/०३/२०१८)**

| अ. क्र. | तपासाअंती मिळालेला तपशील | मालमत्ता धारण/खर्च केल्याची तारीख | विधान अ (परिक्षण कालावधी पुर्वीच्या मालमत्ता) | विधान ब (परिक्षण कालावधीच्या शेवटी असलेल्या मालमत्ता) | विधान क (परिक्षण कालावधीतील उत्पन्न) | विधान ड (परिक्षण कालावधीतील खर्च) |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | निव्वळ वेतन | ०१/०३/२००८ ते ३१/०३/२०१८ | | | ४६,०१,०९६ | |
| ०२ | इंडंस बँकेकडून घेतलेले कर्ज | सन २०१४ | | | ५,५०,००० | |
| ०३ | बँक ऑफ इंडियाकडून घेतलेले कर्ज | सन २००९ | | | ३,५०,००० | |
| ०४ | महिंद्रा बोलेरो हे वाहन विक्रीतून झालेला नफा | २३/०२/२०१६ | | | ३,५०,००० | |
| ०५ | स्टेट बँक ऑफ इंडिया, खाते क्रं. ३०७५८५०५० ५३ मध्ये मिळालेले व्याज | ३१/०३/२००५ ते ३१/०८/२०१५ | | | १,७८,७४१ | |
| ६ | आयसीआयसीआय बँक खाते क्र. १०१६०१५०६९ ०२ मध्ये मिळालेले व्याज | २९/०९/२०१६ ते ३०/०३/२०१८ | | | १४,६६५ | |
| ७ | बँक ऑफ इंडिया, खाते क्र. १२०५१०३१०० ०११५९ मध्ये मिळालेले व्याज | ०२/०२/२०१३ ते ०१/०२/२०१६ | | | ६,४८९ | |
| ८ | अंगझडती मध्ये मिळालेली | १४/०३/२०१८ | | | ५०,००० | |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रक्कम | | | | | |
| ९ | ३३ टक्के न शाबीत होणारा खर्च | ०१/०३/२००८ ते ३१/०३/२०१८ | | | | १५,१८,३६१ |
| १० | कर्जत,जिल्हा रायगड येथे राहते घराच्या भाडेपोटी भरणा केलेली रक्कम | २८/०२/२०१२ ते ३१/०५/२०१५ | | | | १,१७,००० |
| ११ | गै.अ. तावरे यांनी कांदिवली येथे भाडेपोटी भरलेली रक्कम | ०१/०८/२०१५ ते ३१/०३/२०१८ | | | | १०,०६,००० |
| १२ | कांदिवली येथील रूम करीता दिलेले अनामत रक्कम | ऑगस्ट २०१५ ते फेब्रु २०१८ | | | | २,००,००० |
| १३ | इंडसइंड बँक येथे महिंद्रा बोलेरो कंपनीची चारचाकी वाहन कर्जासाठी भरणा केलेले व्याज | २१/०६/२०१४ ते २१/०२/२०१६ | | | | ३,३२,६४० |
| १४ | महिंद्रा बोलेरो गाडीच्या विम्याकरीता भरलेली रक्कम | २६/०६/२०१४ | | | | ३४०५३ |
| १५ | बँक ऑफ इंडिया येथे शेर्वोलेट युवा या वाहन कर्जा साठी भरणा केलेले व्याज | २२/०५/२००९ ते ०१/०९/२०१५ | | | | १,७८,५०० |
| १६ | एल.आय.सी. पॉलीसी क्र. ९५८६३५९६१ व ९५८६३५२४९ वरील गुतवणुक | ०१/०१/२०११ ते २९/०७/२०११ | | | | ११,३२० |
| १७ | मुलगा कु. योगराज प्रदिप तावरे याच्या शिक्षणाचा खर्च | सन २०१६ ते सन २०१९ | | | | १,२२,७२८ |
| १८ | ट्रायडंन्ट हॉटेलचा खर्च | | | | | ६२,८०१ |
| १९ | इतर खर्च | १६/११/२०१२ ते २२/०९/२०१७ | | | | ६,७६,७१३ |

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २० | भ्रमणध्वनी बिलावरील खर्च | सन २००९ ते २८/०२/२०१८ | | | | ५५,००० |
| २१ | ॲपल कंपनीचा आय फोन ८ व आय फोन १० खरेदी | सन २०१६ ते सन २०१७ | | | | १,४३,००० |
| २२ | पेट्रोल खर्च | ०३/०६/२०१४ ते २८/०२/२०१८ | | | | १,९८,५३४ |
| २३ | क्लब महिंद्राकरीता केलेला खर्च | ०८/११/२०१३ ते ०७/०५/२०१६ | | | | १,६०,८९२ |
| २४ | मित्र श्री. राकेश साळुंखे यांना दिलेली रक्कम | १३/११/२०१३ ते ११/०३/२०१४ | | | | १००००० |
| २५ | मित्र श्री. प्रविण मोरे यांना दिलेली रक्कम | १५/१०/२०१३ ते ११/०३/२०१४ | | | | १००००० |
| २६ | मेहूणे श्री. परशुराम भोसले यांना दिलेली रक्कम | १५/१०/२०१३ ते २९/०१/२०१६ | | | | ३,१२,००० |
| २७ | घरझडतीदरम्यान घरी मिळून आलेल्या वस्तू व मालमत्तांची किंमत | १४/०३/२०१८ | | १,६४,५२० | | |
| २८ | घरझडतीमध्ये मिळून आलेली घरखर्चाची रोख रक्कम | १४/०३/२०१८ | | ७००० | | |
| २९ | अंगझडतीमध्ये मिळून आलेला मोबाईल व रोख रक्कम | १४/०३/२०१८ | | १,१०,००० | | |
| ३० | घरझडतीमध्ये मिळून आलेला पत्नीचा मोबाईल | १४/०३/२०१८ | | २०,००० | | |
| ३१ | शेवर्लेट युवा कंपनीचे जिप क्र. MH-४२-H-९६६९ | २२/०५/२००९ ते ३१/०३/२०१९ | | ४,२०,००० | | |
| ३२ | परिक्षण कालावधीच्या शेवटच्या दिवशीची बॅकेतील शिल्लक रक्कम | ३१/०३/२०१८ | | ४,९३,०३६ | | |
| | एकुण | | —— | १२,१४,५५६ | ५२,०३,९७१ | ५३,२९,५८२ |

६. उपरोक्त परिच्छेद क्रमांक ५.१ मधील तपशीलावरून लोकसेवक श्री. प्रदिप तावरे यांच्या संपदेची गणना केली असता ती खालील नमुद तक्त्याप्रमाणे दिसून येते

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दिनांक ३१/०३/२०१८ रोजी असलेली मालमत्ता ( विधान 'ब' ) | रू | १२२१५५६ |
| २ | परिक्षण कालावधी पुर्वीची असलेली मालमत्ता ( विधान 'अ' ) | रू | ०० |
| ३ | परिक्षण कालावधी एकुण मालमत्ता ( ब – अ ) | रू | १२२१५५६ |
| ४ | परिक्षण कालावधी एकुण खर्च ( विधान 'ड' ) | रू | ५३२२५८२ |
| ५ | परिक्षण कालावधी एकुण मालमत्ता व खर्च ( ३, ४ ) | रू | ६५४४१३८ |
| ६ | परिक्षण कालावधी एकुण उत्पन्न ( विधान 'क' ) | रू | ५२०३९७१ |
| ७ | अपसंपदा (५–६) | रू | १३४०१६७ |
| ८ | **अपसंपदेची टक्केवारी** $\frac{DA}{(Total\ Income)} \times 100$ | : | २५.७५% |

७. उपरोक्त परिच्छेद क्र. ५.१ मध्ये नमुद तक्त्यानुसार लोकसेवक श्री. प्रदिप तावरे यांनी त्यांचे परिक्षण कालावधीमध्ये रुपये १३,४०,१६७/– (२५.७५ टक्के) एवढी अपसंपदा संपादित केली आहे. त्याची टक्केवारी खालीलप्रमाणे काढली आहे.

$$\frac{१३,४०,१६७ \times १००}{५२,०३,९७१} = २५.७५ \%$$

८. अशा प्रकारे श्री. प्रदिप तावरे यांनी उपरोक्त परिच्छेद क्रमांक ५.१ अन्वये स्वत:च्या नावे रक्कम रू. १३,४०,१६७/– येवढी अपसंपदा बाळगली असल्याचे निष्पन्न झाले आहे. अपसंपादीत मालमत्ता ही त्यांचे ज्ञात उत्पन्नापेक्षा २५.७५ टक्के अधिक असल्याचे उघड चौकशीत सिध्द झाले आहे. चौकशीमध्ये लोकसेवक श्री. प्रदिप रामचंद्र तावरे यांच्या दिनांक ०१/०३/२००८ ते १४/०३/२०१८ या सेवाकालावधीत त्यांच्या ज्ञात व कायदेशीर उत्पन्नापेक्षा विसंगत अशी एकूण रू. १३,४०,१६७/– २५.७५ टक्के येवढी जास्त अपसंपदा बाळगल्याबाबत ते समाधानकारक खुलासा सादर करून शकले नाहीत म्हणून माझी त्यांचे विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ चे कलम १३(१)(इ) सह १३(२) प्रमाणे सरकार तर्फे फिर्याद आहे.

समक्ष,

(अजित झांजुर्णे)
पोलीस निरीक्षक
लाप्रवि, मुंबई

(सुनील ज्ञानेश्वर लांधी)
पोलीस निरीक्षक
लाप्रवि, मुंबई

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरीता झालेल्या विलंबाची कारणे उघड चौकशीवरुन तात्काळ
Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भुत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भुत मालमत्तेचे एकूण मुल्य
Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक :
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास.स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet. if required) : Detail write down back blank page.

यातील लोकसेवक प्रदीप रामचंद्र सावरे, यांनी त्यांचे सेवाकालावधीत ज्ञात व कायदेशीर उत्पन्नाच्या साधनांशी विसंगत अशी एकूण रुपये ३३,४०,८६७/- इतकी अपसंपदा बाळगली म्हणून त्यांनी भ्र. प्र. अधि. 1988 चे कलम १३(१)(इ) सह १३(२) अन्वये अपराध केला अशा फिर्यादीच्या मजकुरावरुन सदरचा गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही :-** 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
पोलीस निरीक्षक, अजित झांजुर्णे, ला.प्र.वि. मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

3. दुसऱ्या पोलीसं ठाण्याकडे वर्ग करण्यात आला.. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........,

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank........ No. ........
to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P.S ........,
District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.
F.I.R. read over to the Complainant/informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
संपूर्ण नाव Name अजित रामराव झांजुर्णे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई.
तपासिक अं. चा कोड. क्र. ........
Posting
Code No. of I. O. ........

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb Impression
of the Complainant/Informant.
सुनिल [illegible]
पोलिस निरीक्षक २९/०७/२०२२

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4.तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**